# महाराष्ट्र शासन

http://ruraldev.maharashtra.gov.in
gyanoba.shelhale@nic.in
दुरध्वनी - ०२२ २२०१६७९५
फॅक्स - ०२२ २२०१३७८१

क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.५५२/आस्था-७
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
बांधकाम भवन इमारत, पहिला मजला
२५,मर्झबान पथ, फोर्ट , मुंबई-४००००१
दिनांक : २३ जानेवारी, २०२०

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सर्व

विषय :-.संगणक अर्हता प्रमाणपत्र विहित मुदतीत सादर न केल्यामुळे चालू असलेल्या वसूलीस स्थगिती देण्याबाबत.

संदर्भ:- १) सामान्य प्रशासन विभाग यांचे क्र. मातंस २०१८/प्र.क्र.५३/से३९, दि. २०.नोव्हेंबर,२०१८.
२) समक्रमांकाचे दिनांक २० डिसेंबर, २०१८ रोजीचे पत्र.

महोदय,

शासकीय सेवेतील गट-अ, गट-ब व गट-क मधील सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिनस्त कार्यालयातील अधिकारी / कर्मचाऱ्यांना संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर केलेले नाही त्यांच्या वेतनाची वसुली करण्यास स्थगिती देण्याबाबत सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान) यांनी दिनांक २०.११.२०१८ चे पत्र निर्गमीत केले आहे. सदर सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २०.११.२०१८ च्या पत्रामध्ये दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करण्याबाबत ग्रामविकास विभागाने दिनांक २०.१२.२०१८ च्या पत्रान्वये सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना कळविले आहे.

त्याचप्रमाणे संगणक अर्हता प्रमाणपत्र विहित मुदतीत सादर न करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या स्थगितीच्या अनुषंगाने पुढील मुद्यांबाबत सामान्य प्रशासन विभागाकडून दिनांक १९.९.२०१९ च्या टिप्पणीन्वये मार्गदर्शन मागविले होते. :

१) सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या वा दिवंगत कर्मचाऱ्यांच्या वसुलीबाबत स्पष्ट आदेश नाहीत, ते देण्यात यावेत.

२) सदरचे स्थगिती आदेश निर्गमीत होण्यापर्वूी ज्यांच्याकडून वसूली झालेली आहे वा असे कर्मचारी सेवानिवृत्त झाले असल्यास त्यांना वसूल केलेली रक्कम पुनश्च देय होईल काय, तशी देय असल्यास अनुदान निर्धारणेच्या आदेशाबाबत मार्गदर्शन करावे.

३) या स्थगितीमुळे स्थगित केलेल्या रक्कमा कोणत्या लेखाशिर्षात जमा कराव्यात.

प्रस्तुत प्रकरणी वरील मुद्यांच्या अनुषंगाने **"सदर बाबीवर धोरणात्मक निर्णय होईपर्यंत वसुलीस सद्यस्थितीत स्थगिती देण्यात आली आहे."** असे अभिप्राय सामान्य प्रशासन विभागाने दिनांक २.१.२०२० च्या टिप्पणीन्वये दिलेले आहेत.

सबब, विषयांकित प्रकरणी सामान्य प्रशासन विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार कार्यवाही करावी. तसेच यासंदर्भात सामान्य प्रशासन विभाग पुढील आदेश निर्गमित केल्यानंतर त्याप्रमाणे सर्व जिल्हा परिषदाना कळविण्यात येईल.

आपला,

**(प्रि.शं.कांबळे)**

उप सचिव, महाराष्ट्र शासन.